# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक -रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र. १८ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:१७डिसेंबर , २०२१

प्रति,
आयुक्त,
सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका.

विषय: महानगरपालिका पोटनिवडणूक जागा क्र. १६ अ
नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा सर्वसाधारण करुन निवडणूक घेणेबाबत...

संदर्भ: १) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या रिट याचिका ८४१/२०२१, विशेष अनुमती याचिका १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र. १३१६/२०२१ मधील दि. १५/१२/२०२१ रोजीचा निर्णय.

२) राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांकाचा दि.२४/११/२०२१ चा निवडणूक कार्यक्रम व दि. ७/१२/२०२१ चे स्थगिती आदेश.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. VI दि.०१/१०/२०२१ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी २७ टक्क्यांपर्यंत आरक्षण देण्याची तसेच एकूण आरक्षण हे त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही अशी तरतूद करण्यात आली आणि त्यास अनुसरुन दि. २४/११/२०२१ रोजी सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. १६-अ या जागेच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम देण्यात आला. ज्यामध्ये नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी जागा आरक्षित करण्यात आली होती.

आणि ज्याअर्थी, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ व रिट याचिका क्र.१३१६/२०२१ अन्वये सदर दोन्ही अध्यादेशांना मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात

आले. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. ०६/१२/२०२१ रोजीच्या आदेशानुसार सद्यस्थितीत सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रीयेतील नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागांच्या निवडणूकींना स्थगिती दिली. त्यानुसार दि. ०७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आयोगाने सदर नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित केलेल्या जागा क्र. १६-अ ची निवडणूक तात्काळ स्थगित केली.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन रिट याचिकेमध्ये दि. १५/१२/२०२१ रोजीच्या सुनावणी नंतर पारीत केलेल्या आदेशामध्ये राज्य निवडणूक आयोगाला असे स्पष्ट निदेश दिले आहेत की सुरू असलेल्या निवडणुक प्रक्रीयेमधील नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील व्यक्तींसाठी आरक्षित करण्यात आलेल्या ज्या जागांची निवडणूक स्थगित करण्यात आली आहे, त्या जागा तात्काळ अनारक्षित करुन सर्वसाधारण प्रवर्गातून भरण्यात याव्यात.

आणि त्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने संदर्भाधीन क्र. १ अन्वये दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्यादृष्टीने संदर्भाधीन क्र. २ अन्वये जाहीर केलेल्या सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेच्या जागा क्र. १६-अ च्या पोटनिवडणुकीबाबत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

१. राज्य निवडणूक आयोगाने वरील परिच्छेद १ मधील नमूद पोटनिवडणूक कार्यक्रमाकरीता अधिसूचित करण्यात आलेल्या नागरीकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची आरक्षित जागा क्र. १६-अ ही तात्काळ अनारक्षित करण्यात आल्याचे याद्वारे जाहिर करण्यात येत आहे.

२. वर नमूद केल्यानुसार मुलतः नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित असलेली जागा क्र. १६-अ ही सर्वसाधारण प्रवर्गाची होईल. यासंदर्भात अधिसूचनेत योग्य ती सुधारणा करण्याचे अधिकार आयुक्त, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका यांना प्रदान करण्यात येत आहेत.

३. त्यानुसार सुधारीत आरक्षण त्वरित अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

४. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे अनारक्षित करण्यात आलेली जागा क्र. १६-अ अधिसुचित करुन भरण्याचा आणि एकत्रित निकाल जाहिर करण्याचा सुधारीत कार्यक्रम या पत्रासोबतच्या परिशिष्ट-१ नुसार आयोग जाहिर करीत आहे.

५. सदरील कार्यक्रमास योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी.

६. सदर सुधारीत कार्यक्रमानुसार आचारसंहितेचा कालावधी हा हे पत्र निर्गमित केल्याच्या दिनांकापासून मतमोजणीच्या दिनांकापर्यंत लागू राहिल.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार.

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई:- ३२.
२. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई:- ३२
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय आयुक्त, पुणे विभाग
८. जिल्हाधिकारी, सांगली
९. जिल्हा पोलीस अधिक्षक, सांगली
१०. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई
११. राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनेलवरील सर्व वकील
१२. सहायक आयुक्त (जनसंपर्क), राज्य निवडणूक आयोग
१३. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४. सर्व अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१५. निवड नस्ती

राज्य निवडणूक आयोग पत्र क्र.रानिआ/मनपा२०२१/प्र.क्र.१८/का-५, दि. १७/१२/२०२१ सोबतचे

परिशिष्ट-१

मा.सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.८४१/२०२१ मधील दिनांक १५/१२/२०२१ च्या निर्णयानुसार सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिका प्रभाग क्रमांक (१६-अ) नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग हे रिक्त पद सर्वसाधारण करुन निवडणूक घेण्याकरिता कार्यक्रम

| अ.क्र. | टप्पे | दिनांक |
|---|---|---|
| १ | नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभागरचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्याचा व त्याबाबत योग्य ती सूचना व प्रसिध्दी देण्याचा दिनांक | २२/१२/२०२१ (बुधवार) |
| २ | महानगरपालिका आयुक्त यांनी निवडणूक कार्यक्रमाची सूचना शासन राजपत्र व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचा दिनांक | २७/१२/२०२१(सोमवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरिता उपलब्ध असण्याचा दिनांक | २७/१२/२०२१(सोमवार)स.११.०० ते ०३/०१/२०२२ (सोमवार) दु.२.००पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्र स्वीकारण्याचा कालावधी | २७/१२/२०२१ (सोमवार) ते ०३/०१/२०२२ (सोमवार) (स.११.०० ते दु.३.०० पर्यंत) **दि.०२/०१/२०२२ रोजी रविवार असल्याने नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यात येणार नाहीत.** |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी | ०४/०१/२०२२(मंगळवार) (स.११.०० पासून) |
| ६ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदावारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |
| ७ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ०६/०१/२०२२ (गुरुवार)दु.३.०० पर्यंत |
| ८ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | ०७/०१/२०२२ (शुक्रवार) (स.११.०० पासून) |
| ९ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | ०७/०१/२०२२ (शुक्रवार) |
| १० | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | **१८/०१/२०२२ (मंगळवार) सकाळी ७.३० वा.पासून ते सायं.५.३० वा. पर्यंत** |
| ११ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १९/०१/२०२२ (बुधवार) (सकाळी १०.००पासून) |
| १२ | महाराष्ट्र शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २०/०१/२०२२(गुरुवार) पर्यंत |

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र